2 9 NOV 2025
सकाळ

# विद्यापीठातील मुलींच्या वसतिगृहाची पाहणी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मुलींच्या वसतिगृहाची प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी व प्रभारी प्र-कुलगुरू ज्योती जाधव यांनी शुक्रवारी अचानक पाहणी केली. स्वयंपाक घरातील स्वच्छता, जेवणाचा दर्जा, पाण्याची गुणवत्ता याविषयी त्यांनी समाधान व्यक्त केले. डॉ. गोसावी व डॉ. जाधव यांनी सायंकाळी सातच्या सुमारास वसतिगृहांना भेट देत स्वयंपाक घरातील भाज्या अन्नधान्य यांची पाहणी केली. चपात्या चांगल्या पद्धतीने भाजण्याची सूचना केली.

29 NOV 2025

लोकमत

# महिलांच्या सक्षमीकरणासाठी विद्यापीठ प्रयत्नशील : जाधव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ग्रामीण भागातील महिलांमध्ये विविध कष्टाची आणि कौशल्याची कामे करण्याची प्रचंड क्षमता असते. त्यांना सक्षमीकरणाच्या योग्य संधी प्रदान करण्याची आवश्यकता असते. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठ प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी शुक्रवारी केले. विद्यापीठाची यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास प्रशाळा, बेटी बचाओ अभियान आणि जिल्हा परिषद यांच्यावतीने आयोजित 'स्वरोजगारातून सक्षमीकरण' या दोनदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यशाळेत जिल्हा परिषदेचे जिल्हा अभियान व्यवस्थापक दयानंद पाटील, इचलकरंजी रोटरीचे सहायक गव्हर्नर गिरीश कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. प्रशालेचे संचालक डॉ. नितीन माळी यांनी स्वागत केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 NOV 2025
पुण्यनगरी

# डिजिटल साक्षरता, ई-कंटेंट हेच भविष्याचे कौशल्य

## डॉ. के. बी. पाटील यांचे प्रतिपादन

**उचगाव : प्रतिनिधी**

२१ व्या शतकातील शिक्षणव्यवस्थेत शिक्षकांसाठी डिजिटल साक्षरता अनिवार्य ठरणार आहे. गुणवत्तापूर्ण ई-कंटेंट तयार करून विद्यार्थ्यांपर्यंत ज्ञान पोहोचवणे हेच आधुनिक अध्यापनाचे मुख्य कौशल्य आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील सी.डी.ओ.ई.चे संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी केले. ते महावीर महाविद्यालय (स्वायत्त) येथे आयोजित 'शिक्षकांसाठी एक दिवसीय ई-कंटेंट डेव्हलपमेंट' या कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य प्रा. डॉ. अद्वैत जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झाले. प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. महादेव शिंदे व पर्यवेक्षक जावेद मिस्त्री यांची प्रमुख उपस्थिती होती.



महावीर महाविद्यालय आयोजित ई-कंटेंट कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. के. बी. पाटील. सोबत प्रा. डॉ. अद्वैत जोशी, प्रा. डॉ. गोमटेश्वर, डॉ. महादेव शिंदे, डॉ. बाळगोंड पाटील, पर्यवेक्षक जावेद मेस्त्री व डॉ. शशिकांत अन्नदाते.

डॉ. पाटील म्हणाले, 'डिजिटल साधनांचा प्रभावी वापर, अध्यापनातील दृश्य श्राव्य माध्यमांचा समन्वय आणि ई-कंटेंटची गुणवत्ता या तीन गोष्टींच्या आधारे शिक्षण अधिक परिणामकारक बनू शकते.'

प्रास्ताविकातून डॉ. शशिकांत अन्नदाते यांनी ई-कंटेंटची गरज, बदलती अध्यापन पद्धती आणि शिक्षकांनी तंत्रज्ञान स्वीकारण्याची अत्यावश्यकता अधोरेखित केली.

कार्यशाळा चार सत्रांत झाली. कार्यशाळेत डॉ. के. बी. पाटील यांनी डिजिटल साक्षरतेचे महत्त्व, बदलती शिक्षण पद्धती, डॉ. बाळगोंड पाटील यांनी प्रभावी ई-कंटेंटची रचना, मांडणी, तांत्रिक बाबींवर सविस्तर माहिती दिली. डॉ. सुषमा चौगुले यांनी ई-कंटेंट विकसित करण्यासाठी आवश्यक साधनांचे प्रात्यक्षिक सादर केले. प्रा. रिमा मेस्त्री यांनी गुगल क्लासरूम आणि विविध डिजिटल फायलींचा वापर करून ऑनलाईन अध्यापन अधिक सक्षम कसे करावे, याचे प्रशिक्षण दिले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी यांनी शिक्षकांनी डिजिटल माध्यमांतून विद्यार्थ्यांना दर्जेदार, सुबोध आणि सुसंगत शिक्षण देण्याची गरज अधोरेखित केली.

आभार प्रा. विनय बिरंजे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. सुषमा चौगले व डॉ. प्राजक्ता कुरळे यांनी, कार्यक्रमाचे आयोजन डॉ. शशिकांत अन्नदाते, प्रा. रिमा मेश्री व सहकाऱ्यांनी केले.

2 9 NOV 2025

सकाळ

# डिजिटल साक्षरता, ई-कंटेंट हेच भविष्याचे मुख्य कौशल्य

## डॉ. के. बी. पाटील : महावीर महाविद्यालयात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २८ : "एकविसाव्या शतकातील शिक्षणव्यवस्थेत शिक्षकांसाठी डिजिटल साक्षरता अनिवार्य ठरणार आहे. गुणवत्तापूर्ण ई-कंटेंट तयार करून विद्यार्थ्यांपर्यंत ज्ञान पोहोचवणे हेच आधुनिक अध्यापनाचे मुख्य कौशल्य आहे", असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील 'सी. डी.ओ.ई.'चे संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी केले.

महावीर महाविद्यालय (स्वायत्त) येथे शिक्षकांसाठी एक दिवसीय ई-कंटेंट डेव्हलपमेंट कार्यशाळा झाली. प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी अध्यक्षस्थानी होते. डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. महादेव शिंदे, पर्यवेक्षक जावेद मेस्त्री प्रमुख उपस्थित होते.

डॉ. पाटील म्हणाले, "डिजिटल साधनांचा प्रभावी वापर, अध्यापनातील दृश्य-श्राव्य माध्यमांचा समन्वय आणि ई-कंटेंटची गुणवत्ता या तीन गोष्टींच्या आधारे शिक्षण अधिक परिणामकारक बनू शकते." डॉ. शशिकांत अन्नदाते यांनी ई-कंटेंटची गरज, बदलती अध्यापन पद्धती आणि शिक्षकांनी तंत्रज्ञान स्वीकारण्याची अत्यावश्यकता अधोरेखित केली. डॉ. बाळगोंड पाटील यांनी प्रभावी ई-कंटेंटची रचना, मांडणी, शैक्षणिक निकष व तांत्रिक बाबींवर तर डॉ. सुषमा चौगुले यांनी ई-कंटेंट विकसित करण्यासाठी आवश्यक साधनांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवले. प्रा. रिमा मेस्त्री यांनी गुगल क्लासरूम आणि विविध डिजिटल फायलींचा वापर करून ऑनलाइन अध्यापन अधिक सक्षम कसे करावे याचे प्रशिक्षण दिले. प्रा. विनय बिरंजे यांनी आभार मानले. डॉ. सुषमा चौगले, डॉ. प्राजक्ता कुरळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. शशिकांत अन्नदाते, प्रा. रिमा मेस्त्री यांनी आयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 NOV 2025
सकाळ

■ स्त्री मुक्ती परिषद : महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद व शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे स्त्री मुक्ती परिषद. स्थळ : शाहू सिनेट सभागृह, शिवाजी विद्यापीठ. वेळ : सकाळी साडेदहा

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 NOV 2025
सकाळ

■ व्याख्यान : छत्रपती राजाराम महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त डॉ. अवनिश पाटील यांचे व्याख्यान. स्थळ : राजाराम कॉलेज. वेळ : सकाळी साडेअकरा

2 9 NOV 2025

तरुण भारत

# चौगुले महाविद्यालयाच्या संस्कृती पाटीलला कांस्य

**कोलोली :** उदयपूर (राजस्थान) येथे झालेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या ज्युदो संघाचे प्रतिनिधित्व करणारी श्रीपतराव चौगुले आर्टस् अॅण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी येथील विद्यार्थिनी संस्कृती प्रकाश पाटील हिने ७८ किलो वजन गटामध्ये कांस्य पदक मिळवले.

तिला संस्थेचे संस्थापक- अध्यक्ष डॉ. के. एस. चौगुले, संस्था सचिव शिवाजीराव पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील तसेच क्रीडा विभाग प्रमुख शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संग्रामसिंह मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेच्या व महाविद्यालयाच्यावतीने संस्कृती पाटीलचा सत्कार करण्यात आला. येथील क्रीडा संस्कृतीचा गौरव अधिक वृद्धिंगत करणारी ठरली आहे.

2 9 NOV 2025

लोकमत

# आदिती स्वामीला सुवर्णपदक



**कोल्हापूर :** जयपूर येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या आदिती स्वामीने कंपाऊंड आर्चरीमध्ये सुवर्णपदक पटकावले. शुक्रवारी विद्यापीठाने तीन पदके मिळवली. ज्यूदो महिला स्पर्धेत ७८ किलो वजनी गटात संस्कृती पाटील हिने कांस्यपदक आणि सायकलिंगमध्ये ट्रॅक टाइम ट्राइल प्रकारात सायली आरंडे हिने कांस्यपदक मिळवले. आजअखेर शिवाजी विद्यापीठाने एकूण दोन गोल्ड दोन सिल्वर व पाच ब्रांझ मेडल मिळवले.